पावरग्रिड POWERGRID

पावर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
(भारत सरकार का उद्यम)
**POWER GRID CORPORATION OF INDIA LIMITED**
(A Government of India Enterprise)

आई.एस.ओ 9001:2015 .प्रमाणित कंपनी • ISO 9001:2015 Certified Company
महारत्न कंपनी • A Maharatna Company

पश्चिम क्षेत्र -I / WESTERN REGION - I

दिनांक: 27.09.2021

द्वारा:- रजिस्टर्ड पोस्ट/पावती
संदर्भ संख्या: प.क्षे.पा.प्र.-1/पी.एम.एस./340/156

**सेवा में,**
**श्री किरण राजेरामजी मानकर**
**मु- चांदेवानी , पो. - कारंजा,**
**त.- वर्धा जि.- वर्धा, पिन -442203**

विषय:- सूचना के अधिकार अधिनियम 2005 के अंतर्गत आवश्यक जानकारी ।

महोदय ,
आपका पत्र दिनांक. 23.08.21, जो इस कार्यालय में दिनांक: 28.08.21 को प्राप्त हुआ है, आपके आरटीआई आवेदन द्वारा चाही गयी जानकारी निम्नानुसार प्रस्तुत है:

| | | |
|---|---|---|
| क्र ० 1 | चाही गई जानकारी | विद्युत अधिनियम 2003 धारा 164 नुसारआदेश क्र. WRTS/WRD/ TLC/S-W/A2/CKT-2 दि.24/12/2003 पावर ग्रिड कोर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड द्वारा निर्मित 765 के व्ही शिवानी - वर्धा लाईन मध्ये एकुन किती टावर उभारन्यांत आले |
| | जवाब | 765 के व्ही सिवनी टावर है। 707 मे सिवनी से लेकर वर्धा तक कुल 01 वर्धा लाईन –<br>765 के व्ही सिवनी टावर है। 717 मे सिवनी से लेकर वर्धा तक कुल 02 वर्धा लाईन – |
| क्र ० 2 | चाही गई जानकारी | शेतक-याची नावे,गाव शेत सर्वे न. व बाधित क्षेत्रफळ यांची यदि देण्यात यावी। पावर ग्रिड कोर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड द्वारा 765 के व्ही शिवनी - वर्धा लाईन मूळे बाधित शेतक-याना किती मोबादला (नुकसान भरपाईची) देण्यात आला त्याची शेतक-याचे नावे व नुकसान भरपाईची रक्कम सह देण्यात यावी। |
| | जवाब | पावरग्रिड द्वारा प्रदान की गई कुल फ़सल एवं पेड़ मुआवजा राशि का विवरण निम्नानुसार है:<br>765 के व्ही सिवनी – वर्धा लाईन1 (पूर्व में लाईन 2)<br>कुल फ़सल मुआवजा राशि – Rs. 2,69,60,301.00<br>कुल पेड़ मुआवजा राशि- Rs. 4,22,79,119.00<br><br>765 के व्ही सिवनी – वर्धा लाईन 2 (पूर्व में लाईन 1)<br>कुल फ़सल मुआवजा राशि – Rs. 1,33,29,672.00<br>कुल पेड़ मुआवजा राशि- Rs. 55,52,309.00<br><br>एवं आपके आरटीआय अनुरोध पत्र में पावरग्रिड द्वारा उपरोक्त लाईन में प्रत्येक किसान को प्रदान की गई फ़सल एवं पेड़ मुआवजा राशि के संबंध में जानकारी मांगी गई है , जिसमें किसी भी सार्वजनिक हित का खुलासा नहीं किया गया है एवं यह जानकारी तीसरे पक्ष के वित्तीय लेन – देन से संबंधित है और जानकारी प्रदान करने के लिए उनकी सहमति हमारे पास उपलब्ध नहीं है। इसलिए, आरटीआई अधिनियम 2005 की धारा 8 (1) (j) के प्रावधानों के अनुसारआपको तीसरे पक्ष के संबंध में जानकारी पावरग्रिड द्वारा नहीं दी जा रहीं है। |
| क्र ० 3 | चाही गई जानकारी | पावर ग्रिड कोर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड द्वारा 765 के व्ही शिवनी - वर्धा लाईन ज्या शेत जमिनि मधून गेली आहे . त्या शेतात फळझाडे जसे आंबा पेरु, संत्रि, मोसम्बी लागवड करायची आहे तर टावर व टावर लाईन पासून किती स्वेअर मीटर जागा सोडून लागवड करावी . त्याबाबतचे सरकारी नियम (GR) शाषण निर्णयप्रत देण्यात यावी. |
| | जवाब | 765 के व्ही सिवनी – वर्धा लाईन का गलियारा (Corridor) 64 मीटर है। इस गलियारे मे संतरा, मोसम्बी इत्यादी., जिनकी ऊँचाई 5 मीटर से ज्यादा नहीं बढ़ती, ऐसे पेड़ लगाये जा सकते है। ज्यादा ऊँचाई वाले पेड़ 64 मीटर गलियारे (32 मीटर टावर मध्य से लाईन के दोनों बाजू से) के बाहर लगाये जा सकते है । इस बारे मे विस्तृत जानकारी के लिऐ भारतीय विद्युत नियम 2005 (Electricity Rules'2005) का संदर्भ देखे | |
| क्र ० 4 | चाही गई जानकारी | टावर लाईन मुळे बाधित शेतकया मोबदला-याना देण्यात येणा- बाबत २००३ शाषण निर्णय (नुकसान भरपाईची),२०१५, २०१८ ची प्रत देण्यात यावी |
| | जवाब | आवेदक द्वारा किस शासण निर्णय की प्रत मांगी गई है , यह स्पष्ठ नहीं है; अत: इस संबंध में उपलब्ध महाराष्ट्र शासण निर्णय 31/ मई/ 2017 निर्णय की प्रति इस पत्र के साथ संलग्न है। |

27/09/2021

*(In continuation to letter ref. no.* प.क्षे.पा.प्र.-1/पी.एम.एस./340/156 *dated: 27.09.2021)*

पावरग्रिड

उपरोक्त जानकारी से संबंधित यदि आपको कोई अपील करना हो तो उसे पीआईओ के उत्तर की प्राप्ति से 30 दिनों के भीतर अपीलीय अधिकारी को किया जा सकता है।

**अपीलीय अधिकारी का पता-**
श्री. एस.रविंदर कुमार , कार्यपालक निदेशक प.क्षे.-1
पावरग्रिड कारपोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड ,
पश्चिम क्षेत्र-1, सम्प्रीति नगर, नारीरिंग रोड़,
पोस्ट -उप्पलवाडीनागपुर – 440026
दूरध्वनीक्रमांक-0712-2641470

27/9/2021

(पंकज दलाल)
जन सुचना अधिकारी
पावरग्रिड, पश्चिम क्षेत्र -1, नागपुर
दूरध्वनीक्रमांक 0712- 2641484
ईमेल : pankajdalal@powergridindia.com

**प्रतिलिपि सादर सूचनार्थ:**
1) कार्यपालक निदेशक पश्चिम क्षेत्र -1
2) व. महाप्रबंधक (वर्धा)

-११५-

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ६६ के.व्ही ते ७६५ के.व्ही. पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात आलेल्या / येणाऱ्या मनोऱ्यांच्या जागेचा मोबदला देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण ०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ नोव्हेंबर,२०१०

वाचा:- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचे क्रमांकःमहापारेषण/सांका/प्रा.प्र./आरओडब्ल्यू/१४३०, दिनांक २९/१/२०१०

<u>प्रस्तावना</u> :- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) च्या कार्यक्षेत्रात ६६ के.व्ही. ते ७६५ के.व्ही. च्या पारेषण वाहिन्यांची उभारणी आणि अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची देखरेख, दुरुस्ती, नूतनीकरण ही कामे नेहमी होत असतात. बरेच वेळा पारेषण वाहिन्यांची उभारणी व अस्तित्वात असलेल्या वाहिन्याचे नूतनीकरण / दुरुस्तीची कामे करीत असताना निरनिराळया प्रकारचे अडथळे व जमीनधारकांकडून याबाबत विरोध होत असतो. महापारेषण कंपनीतर्फे विद्युत वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यामुळे व्यापलेल्या जमिनीचा क्षतीपूर्ती / मोबदला देण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांच्याकडून महापारेषण कंपनीतर्फे विद्युत वाहिन्यांच्या उभारणीसाठी मनोऱ्यानी व्यापलेल्या जमिनीचा क्षतीपूर्ती /मोबदला (प्रस्तुतची व्यापलेली जमीन अधिग्रहित न करता ) जमीनीच्या खालील तपशीलात नमूद केलेल्या वर्गीकरणाच्याआधारे व संबंधित भागातील वार्षिक बाजार मुल्य दर तक्त्याप्रमाणे असलेल्या जमिनीच्या दरांच्या आधारे क्षतीपूर्ती / मोबदला मंजूर करण्यास शासन मंजूरी देत आहे.

1 3 DEC 2010

47926/२०११

रोटे/एच-६२२१[१०००-११-२०१०]-१

[कृ.मा.प.

| जमिनीचा वर्ग | जमिनीचा प्रकार | जमिनीचा मोबदला |
|---|---|---|
| अ) | गैर सिंचनाखालील कृषि जमीन (कोरडवाहू) | २५ टक्के |
| ब) | सिंचनाखालील कृषि जमीन (ओलीत | ५० टक्के |
| क) | बागायती व फळबागांची कृषि जमीन (बागायती जमीन) | ६० टक्के |
| ड) | गैर कृषि जमीन (शहरी जमीन) | ६५ टक्के |

२. वरीलपैकी वर्ग-अ आणि वर्ग-ब मधील जमिनीचा मोबदला ठरविण्याचे अधिकार संबंधित विभागीय उपजिल्हाधिकारी यांना तसेच वर्ग-"क" व "ड" मधील जमिनी संबंधी मोबदला ठरविण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. सदरचे मुल्यांकन मंजूरीची प्रकरणे त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय समितीमार्फत ३० दिवसात निकाली काढण्यात यावेत.

३. सदर निर्णय खाजगी कंपनी तसेच पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन यांना त्यांचे मनोरे उभारण्यासाठी व्यापलेल्या जमिनीच्या प्रकरणीही लागू राहील.

४. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक : संकीर्ण ६/२०१०/९०/ज-१, दिनांक १८/६/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सी.के.जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
अप्पर मुख्य सचिव (महसूल व वने),मंत्रालय,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
मा.मंत्री (ऊर्जा) यांचे विशेष कार्य अधिकारी
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व मंत्रालयीन विभाग
पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (पत्राद्वारे)
महसूल व वन विभाग (कार्यासन ज-१), मंत्रालय,मुंबई.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती- ऊर्जा-४

Raut- G.R.
एच-२६३२ -१३।.

Dy Mgr (TRM) 13/6

**राज्यातील ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अतिउच्च दाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेच्या मोबदल्यात वाढ करण्याबाबत व वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला देणेबाबतचे धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : ३१ मे, २०१७

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ०२१०/प्र.क्र. २९/उर्जा-४ दि. ०१.११.२०१०
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.३/७/२०१५-पारेषण,दि. १५/१०/२०१५.
३) शासन पत्र, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. संकीर्ण- २०१५/प्र.क्र.३९८/ ऊर्जा-४ , दि. २५/०८/२०१५
४) महापारेषण कंपनीचे पत्र क्र. मराविपाकंम/सांक/१३२७९ दिनांक १६.१२.२०१६

**प्रस्तावना :-**

भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६४ तसेच टेलिग्राफ अधिनियम, १८८५ कलम १०(ड) अनुसार व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्र. ०६/सीआर ३१२/४, दि. २४.०८.२००६ अन्वये महापारेषण कंपनीला पारेषण वाहिन्या व मनोऱ्यांच्या उभारणी संबंधात अधिकार प्राप्त आहेत. तसेच सदर अधिकारांचा वापर करत असतांना झालेल्या नुकसानीबद्दल संबंधितांना पूर्ण नुकसानभरपाई अदा करण्याचीही तरतूद आहे.

राज्यात विविध शासकीय व खाजगी पारेषण कंपन्या व परवानाधारकांमार्फत ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पारेषण वाहिनी उभारणी आणि अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची देखभाल- दुरूस्ती, नूतनीकरणाची कामे करण्यात येतात. प्रत्यक्ष कामाच्या वेळी बरेचदा पारेषण वाहिन्यांची उभारणी व अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांचे नूतनीकरण व दुरूस्तीची कामे करीत असतांना शेतकरी व जमीनधारकांकडून मोबदल्याच्या अनुषंगाने विरोध होत असतो. महापारेषण कंपनीकडून व इतर पारेषण धारक कंपन्याकडून विद्युत वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यामुळे व्यापलेल्या जमिनीचा मोबदला वर संदर्भांकीत दिनांक ०१.११.२०१० च्या शासन निर्णयानुसार सध्या देण्यात येत आहे. तथापि सदरचा मोबदला वाढवून मिळावा व त्याबरोबरच वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदलाही मिळावा अशी मागणी शेतकरी/जमिनधारक यांचेकडून शासनाकडे सातत्याने होत आहे. त्यामुळे मोबदल्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन तसेच मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (ऊर्जा) यांच्या स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने महापारेषण कंपनीने उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. तद्नंतर दिनांक १६.०५.२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिनांक २२.०५.२०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत टिप्पणी सादर करण्यात आली होती.

Powergrid, ... Wardha
14/06/17
6550

त्यावर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व इतर सर्व परवाना धारक कंपन्यांकडून, पारेषण वाहिन्यांच्या उभारणीसाठी मनोऱ्याने व्याप्त तसेच वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा (प्रस्तुतची व्यापलेली जमीन अधिग्रहित न करता) खालीलप्रमाणे मोबदला देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

१) अतिउच्चदाब मनोऱ्याने व्याप्त जमीनीच्या मोजणीप्रमाणे आलेल्या क्षेत्रफळाचे, जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या संबंधित भागातील शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे (Ready Reckoner) मूल्यांकन करुन त्याच्या दुप्पट मोबदला देण्यात यावा.

२) अतिउच्चदाब पारेषण वाहिनीच्या तारेखालील (Wire Corridor) जमिनीचा, त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या संबंधित भागातील शासनाच्या दर पत्रकाप्रमाणे (Ready Reckoner) मूल्यांकनाच्या १५% मोबदला देण्यात यावा.

३) पिकांची, फळझाडांची किंवा इतर झाडांची नुकसान भरपाई प्रचलित धोरणाप्रमाणे देण्यात यावी.

४) वरील प्रमाणे मोबदला देण्याचे धोरण राज्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनी लि., इतर शासकीय तसेच खाजगी पारेषण परवानाधारकांकडून उभारल्या जाणाऱ्या सर्व ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अतिउच्चदाब वाहिन्या एचव्हीएसी/डीसी पारेषण वाहिन्यांसाठी लागू राहील.

५) हे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिका व उपनगरीय क्षेत्र वगळून राज्यातील इतर क्षेत्रासाठी लागू राहील. शहरी भागातील जमिनीत उभारण्यात येणाऱ्या अतिउच्चदाब वाहिन्यांबाबत मोबदला देण्यासंदर्भात केंद्र शासनातर्फे दिनांक ११.०८.२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासन स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका व उपनगरीय क्षेत्राकरिता नवीन धोरण लागू करण्यात येईल.

६) शहरी भागात जेथे पारंपारिक मनोरे उभारणे शक्य नसेल तेथे वाहिनी उभारण्यास तांत्रिकदृष्ट्या शक्य अशा मोनोपोल मनोरे, नॅरो बेस मनोरे, बहुपथ मनोरे, विशेष मनोरे, हाय ॲम्पॅसिटी कंडक्टर तसेच केबल वापरामधील नवीन तंत्रज्ञान यांचा वापर करण्यात यावा.

२. **अंमलबजावणीची तारीख :-**

हे नवीन धोरण या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

३. **जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती:-**

३.१. अति उच्चदाब मनोऱ्याने व्याप्त व वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला ठरविण्यासाठी शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/ऊर्जा-४, दि. २५.०८.२०१५ मध्ये दिलेल्या सूचनानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्हयात समितीची स्थापन करावी.

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | उप विभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) | अध्यक्ष |
| २ | उप अधीक्षक भूमी अभिलेख | सदस्य |
| ३ | तालुका / जिल्हा कृषि अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित पारेषण परवानाधारक कंपनीचे प्रतिनिधी (महापारेषण, पॉवर ग्रीड, महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्स.कं. इ.) | सदस्य |

३.२ सदर समितीने आपल्या विभागांतर्गत उभारलेल्या अतिउच्चदाब मनोऱ्याने व्याप्त व वाहिनीच्या तारेखालील जमिनीची मोजणी करावी व प्रस्तावाप्रमाणे मूल्यांकन करुन मोबदला निश्चित करावा.

३.३ समितीने निश्चित केलेला मोबदला, बाधित जमिनमालकास मान्य नसल्यास अशी व्यक्ती संबंधित भागातील जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल करु शकेल. जिल्हाधिकारी यांना सदर अपिलात तथ्य वाटल्यास ते सदर समितीस पुनर्मूल्यांकनाबाबत सूचना देऊ शकतील. याबाबतीत पुढील सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे राहतील.

४. **धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**

४.१ एखाद्या जमिनीच्या मोबदल्यासंदर्भात एकापेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असल्यास, त्यांनी मुखत्यारपत्र लिहून दिलेल्या व्यक्तीच्या नावावर एकाच धनादेशाद्वारे मोबदला अदा करावा व जिल्हास्तरीय समितीने निर्देशित केल्यानंतर सदर मोबदला दिल्याची नोंद बाधित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यात यावी.

४.२ समितीतर्फे जमिनीची मोजणी केल्यानंतर मोजणीची आकडेवारी अपूर्णांकात येत असेल तर ती पुढील पूर्णांकात समायोजित करण्यात यावी. उदा. मोजणीची आकडेवारी २७.४ वर्गमीटर असेल तर ती २८ वर्गमीटर अशी समायोजित करण्यात यावी.

४.३ जमिनीच्या मोबदल्याची रक्कम ही कोणत्याही परिस्थितीत रु. १०००/- पेक्षा कमी असू नये. मोबदल्याची रक्कम रु. १०००/- पेक्षा जास्त आल्यास प्रत्यक्षातील रक्कम देण्यात यावी.

४.४ भारतीय विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १७७, उप कलम (२)(इ) नुसार केंद्रीय विद्युत प्राधिकरणास (Central Electricity Authority) विद्युत प्रकल्प (Electrical Plants) व विद्युत वाहिन्या यांच्या उभारणीबाबतची तांत्रिक मानके

(Technical Standards) ठरविण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. प्रत्येक पारेषण परवानाधारकांच्या अभिकल्प विभागाने (Design Department) या तांत्रिक मानकांच्या अधीन राहूनच मनोऱ्यांच्या आरेखनाचे (Design) काम करावे. वाहिनीच्या तारेखालील जमिनीची मोजणी करण्यासाठी, तारेखालील जमिनीची रुंदी, अभिकल्प (Design Department) विभागाने मान्यता दिलेल्या मनोरा आरेखनानुसार असावी.

६. **मोबदला देण्याची कार्यपध्दती :-**

**६.१ मनोरा व वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला देण्याबाबतची कार्यवाही :-**

मनोऱ्याखालील जमिनीच्या मोबदल्याची रक्कम समान दोन टप्प्यात देण्यात यावी. पहिल्या टप्प्यातील मोबदला मनोरा पायाभरणीनंतर व दुसऱ्या टप्प्यातील मोबदला मनोरा उभारणीनंतर देण्यात यावा. ज्या जमिनीतून वाहिनी उभारण्यात आली आहे अशा ठिकाणी तारेखालील जमिनीचा मोबदला प्रत्यक्ष वाहिनी उभारल्यानंतर तिसऱ्या टप्प्यात देण्यात यावा.

**६.२ फक्त वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला:-**

ज्या जमिनीतून फक्त वाहिनीच्या तारा गेलेल्या आहेत अशा ठिकाणी तारेखालील जमिनीचा मोबदला प्रत्यक्ष वाहिनी उभारल्यानंतर देण्यात यावा. याबाबतची कार्यपद्धती सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आली आहे.

**६.३ पिकांचा / फळझाडांचा मोबदला :-**

वरील मोबदल्याशिवाय मनोरा पायाभरणी, उभारणी व वाहिनी उभारणी करतांना पिकांचे/फळझाडांचे/इतर झाडांचे नुकसान झाल्यास त्याचा मोबदलाही दोन टप्प्यात देण्यात यावा.

७. जमिनीच्या मालकीत बदल झाल्यास, नवीन मालक कोणत्याही प्रकारे मोबदला मिळण्यास पात्र असणार नाही.

८. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्थानिक प्राधिकरणे, नगरपालिका, महानगरपालिका, एम.एम.आर.डी.ए., राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणे, सार्वजनिक बागा, करमणूक केंद्र, मिठागरे, विशेष आर्थिक क्षेत्रे, मुख्य / किरकोळ बंदरे नदी व खाडी, क्रिडा संकुल, शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था इत्यादी मनोऱ्याने व्याप्त वाहिनीच्या तारेखालील जमिनीच्या मोबदल्यास पात्र नाहीत. मात्र अपवादात्मक परिस्थितीत, संबंधित पारेषण कंपनी त्याबाबत निर्णय घेऊ शकेल. त्याचप्रमाणे केंद्र शासन व रेल्वेच्या अधिपत्याखालील जमिनींचा मोबदला, केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयांच्या विहित नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार देण्यात यावा.

९. अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांची क्षमतावाढ वा आधुनिकीकरण करावयाचे असल्यास, मनोऱ्याने व्याप्त व वाहिनीच्या तारेखालील वाढीव क्षेत्रासाठीच मोबदला देण्यात यावा.

१०. या निर्णयाची अंमलबजावणी करताना काही अडचणी, स्पष्टीकरण उद्‌भवल्यास, त्या सोडविण्यासाठी प्रधान सचिव, ऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये संबंधित पारेषण कंपनीचे व पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीचे प्रतिनिधी असावेत. सदर समितीच्या सदस्य-सचिव पदी मुख्य अभियंता, राज्य पारेषण (उपक्रम) हे राहतील.

११. हा शासन निर्णय, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२२/२०१७ दि. १९.०४.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६०१११२३५६८५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2017.06.01 12:35:10 +05'30'

(भि. य. मंता)
शासनाचे उप सचिव

**सोबत :** परिशिष्ट

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महारांष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५) मा .मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
१०) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००५
११) महालेखापाल लेखा १- (लेखापरिक्षा) महाराष्ट्र, मुंबई ४०००२०
१२) महालेखापाल लेखा १- (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई ४०००२०
१३) महालेखापाल लेखा १- (लेखापरिक्षा) महाराष्ट्र, नागपूर
१४) महालेखापाल लेखा १- (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर

१५) अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१
१६) सर्व मंत्रालयीन विभाग.
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कं. ३ रा मजला, हाँगकाँग बिल्डींग, हुतात्मा चौक, मुंबई- ४०० ०२३
१८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व मुंबई- ४०० ०५१
१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. प्रकाशगड, वांद्रे पूर्व मुंबई- ४०० ०५१
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या. प्रकाशगड, वांद्रे पूर्व मुंबई- ४०० ०५१
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) कार्यकारी संचालक, पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नारा-नारी रिंग रोड, संप्रती नगर, नागपूर
२३) वित्त विभाग (व्यय-१६) मंत्रालय मुंबई.
२४) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
२५) निवड नस्ती (ऊर्जा-४).

**शासन निर्णय क्रमांक : धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दिनांक ३१ मे, २०१७ सोबतचे**

**सहपत्र**

**परिशिष्ट**

**पारेषण वाहिनीच्या तारेखालील बाधित क्षेत्राच्या मोजणीची कार्यपद्धती :-**

- एकपथ मनो-यावरील एकपथ वाहिनीची मोजणी ही दोन सर्वात दूरच्या तारांमधील अंतर हे रूंदी म्हणून धरण्यात यावी.
- द्विपथ/बहुपथ मनो-यांवरील उजव्या व डाव्या बाजूच्या वाहिन्यांकरिता मनो-याची मध्य रेषा व डावीकडील वाहिनी/वाहिन्यांसाठी डावीकडील तारा व मध्य रेषेतील अंतर हे रूंदी म्हणून धरण्यात यावी. तसेच उजवीकडील वाहिनी/वाहिन्यांसाठी मनो-यांची मध्य रेषा व उजवीकडील तार यांच्यातील अंतर हे रूंदी म्हणून धरण्यात यावे.
- सदर पट्ट्याची लांबी ही दोन लगतच्या मनो-यांना जोडणा-या मध्य रेषेला जेथे बाधित क्षेत्राचा बांध छेदेल ती धरण्यात यावी.
- सदरची लांबी व रूंदी ही मिटर या एककात मोजण्यात यावी.
- सदरच्या मोजमापासाठी संबंधीत शेतक-याच्या समक्ष पंचनामा करून संयुक्त मोजणी तलाठी, संबंधीत पारेषण कंपनीचे प्रतिनिधी व संबंधीत शेतकरी यांनी करावी.
- ज्यांच्या शेतात द्विपथ अथवा बहुपथ वाहिनी जाते त्यांना मनो-यातील मध्य रेषेच्या डाव्या व उजव्या अशा दोन्ही बाजूसाठी ज्या प्रमाणात काम पूर्ण होईल त्या प्रमाणात मोबदला देण्यात यावा.
- एकूण बाधित क्षेत्र हे खालीलप्रमाणे देण्यात यावे -

  **अ) रूंदी -**

  १) एकपथ मनो-यांवरील एकपथ वाहिनीसाठी दोन सर्वात दूरच्या तारांमधील अंतर.

  २) द्विपथ / बहुपथ मनो-यांवरील वाहिनीसाठी उजव्या / डाव्या बाजूस असणा-या वाहिनीसाठी मनो-यांमधील मध्य रेषा व उजव्या अथवा डाव्या तारेमधील अंतर.

  **ब) लांबी -**

  मनो-याच्या मध्य रेषेस शेतातील बांध जेथे छेदतील त्यांच्यातील अंतर हे लांबी म्हणून धरण्यात येईल.

क) एकूण बाधीत / तारेखालील क्षेत्रफळाचा मोबदला = लांबी (अ) X रूंदी (ब) X रेडी रेकनर दर (प्रती चौरस मीटर मध्ये) X १५%

- अपवादात्मक परिस्थितीत बाधित जागेचा मोबदला ठरविण्याचे अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांचे राहतील.

***********